CNR NO. **MHRG**040017752025 1 दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७७२/२०२५

नि.क्र.– ०१

MHRG040017752025

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७७२/२०२५**

**संगिता नंदकिशोर बजाज**

**विरूध्द**

**कोणीही नाही**

**<u>पाचवे सह. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, पनवेल, यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः आर.वाय.खंडारे यांचे समक्ष)

**<u>निशाणी ०१ खालील आदेश</u>**

**०१.** अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज १८२७ च्या बॉम्बे रेग्युलेशन क्र. VIII अन्वये वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार हया **मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज** यांच्या पत्नी आहेत. नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज हे दि. ०४/०५/२०२१ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत व त्यांना मुलबाळ नाही. मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज यांना अर्जदाराचे व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही. मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज यांच्या आई दयावंतीबाई चतुर्भुजदास बजाज हया दि. १४/०४/१९७१ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच त्यांचे वडिल चतुर्भुजदास जेसासींग बजाज हे दि. ०२/०३/१९८२ रोजी मयत झाले आहेत. मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज यांच्या नावावर असलेली अर्जाच्या परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद मालमत्ता आहे व मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज यांच्या मृत्यूनंतर सदर मालमत्तेतील त्यांच्या हिश्श्याला अर्जदार यांची नांवे वारस म्हणुन लावण्यासाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** अर्जदारांनी **नि.क्र.०९** प्रमाणे दि.०५/१२/२०२५ रोजी जाहिरनामा व दि. ३१/०७/२०२५ रोजी दैनिक 'जनखुलासा' मध्ये जाहिर नोटीस दिल्यानंतर ३० दिवसांत कोणीही सदरच्या अर्जास हरकत घेतलेली नाही.

०४. वरील कथनास पुष्टी देण्याकरिता अर्जदार संगिता नंदकिशोर बजाज हिने स्वत:चे पुराव्याचे शपथपत्र **नि.क्र.१२** वर दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या पतीच्या मृत्यु प्रमाणपत्राचा मुळ दाखला **नि. १३** वर दाखल केला आहे. तसेच त्यांनी त्याचे सासु व सासरे यांच्या मृत्यूच्या पडताळलेल्या प्रती **नि.१४ व १५** वर दाखल केल्या आहेत. तसेच त्यांच्या सास–यांच्या नावावर असलेल्या नोदणीकृत खरेदीखत क्र.४८०९/२००९ ची पडताळलेली प्रत **नि.१६** वर दाखल केली आहे. अर्जदाराने तिचे आधारकार्डची पडताळलेली प्रत दाखल केलेली आहे. **आर्टिकल 'अ'** वर वृत्तपत्रात जाहिर करण्यात आलेली नोटीस दाखल करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त **नि.क्र. ०९** वर जाहिरनाम्याची बजावणी करण्यात आलेली आहे. **नि.१७** नुसार अर्जदार यांनी पुरावा बंद पुरसिस दाखल केली आहे.

०५. अर्जदारांनी साक्षीमध्ये सांगितलेल्या कथनास कागदपत्र दुजोरा देतात. **नि.१६** वरील खरेदीखतानुसार सदर प्रकरणातील मालमत्ता मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज व अर्जदार संगिता बजाज यांच्या नावाने असल्याचे दिसुन येते. अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज यांना कोणीही वारस नसल्याबाबतचा अर्जदाराचा पुरावा विना आव्हानित असल्यामुळे त्यास शंका घेण्याचे कोणतेही कारण दिसून येत नाही. वरील विवेचनावरून अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे समाधान झाल्यावरून अर्जदार वारसाचा दाखला मिळविण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १ | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २ | अर्जदार **संगिता नंदकिशोर बजाज** हया **मयत नंदकिशोर चतुर्भुजदास बजाज** यांचे अर्जाच्या परिच्छेद क्र. ०४ मध्ये नमुद मिळकतीमध्ये त्यांच्या हिश्शाचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र मिळकतीच्या मुल्यांकनावर योग्य ती कायदेशीर कोर्ट फी आकारून अर्जदार यांना देण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ३ | सदरचे प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) असून ते उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) नाही. |
| ४ | नाझर यांनी कायद्याप्रमाणे आवश्यक असलेली कोर्ट फीचा तपशिल द्यावा. |
| ५ | सदर प्रमाणपत्र दिवाणी नियमावली प्रकरण १४ परिच्छेद ३१२ मधील टिपणीस अधीन राहून देण्यात येत आहे. अर्जदार यांनी प्रमाणपत्र प्राप्ती पासून वरील टिपणीस अनुसरून पुढील पूर्तता करावी. |

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.10 11:58:34 +0530

**दि. ०९/०३/२०२६** **(आर. वाय. खंडारे)**

**पनवेल.** **पाचवे सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर,**

**पनवेल.**